महाराष्ट्राच्या कृषी व्यवस्थेला मिळावे नवे अधिष्ठान; स्वतंत्र शेतकरी आयोगाच्या स्थापनेसाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांची मुख्यमंत्र्याकडे ठोस मागणी

१ कोटी ७१ लाखांहून अधिक कृषी धारणांच्या हितासाठी स्वतंत्र, स्वायत्त व अधिकारसंपन्न आयोगाची आ.मुनगंटीवार यांची आग्रही मागणी

आ.मुनगंटीवार यांचा शेतकऱ्यांच्या तक्रारी, हक्क आणि न्यायासाठी स्वतंत्र कायद्याचा शासनाकडे प्रस्ताव

मुंबई - महाराष्ट्राच्या कृषी व्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे आता केवळ स्वतंत्र योजनांच्या किंवा तात्कालिक उपाययोजनांच्या चौकटीतून न पाहता, एका सक्षम आणि स्वायत्त यंत्रणेच्या माध्यमातून सर्वंकष दृष्टिकोनातून पाहिले जावे, या व्यापक भूमिकेतून माजी अर्थमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याच्या कृषी धोरणासमोर एक महत्त्वपूर्ण संकल्पना मांडली आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ अनुदान, कर्जमाफी किंवा नुकसानभरपाईपुरत्या मर्यादित नसून, त्यामागे प्रशासकीय दिरंगाई, योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटी, बाजारपेठेतील अनिश्चितता आणि न्याय मिळविण्यासाठी करावी लागणारी परवड अशा अनेक प्रश्नांचे गुंतागुंतीचे वास्तव आहे. या सर्व प्रश्नांचा एकत्रित विचार करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्रात स्वतंत्र, स्वायत्त व अधिकारसंपन्न 'महाराष्ट्र राज्य शेतकरी आयोग' स्थापन करण्यात यावा, अशी आग्रही मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली असून, यासंदर्भात त्यांनी सविस्तर निवेदन सादर केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५ नुसार, कृषी गणना २०२१-२२ च्या तात्पुरत्या आकडेवारीप्रमाणे राज्यात एकूण १ कोटी ७१ लाख ११ हजार कार्यरत कृषी धारणांची नोंद असून त्यांचे एकूण क्षेत्र सुमारे २१०.७९ लाख हेक्टर आहे. ही आकडेवारी राज्यातील कृषी व्यवस्थेचा व्यापक आवाका अधोरेखित करते. एवढ्या मोठ्या कृषी क्षेत्राशी निगडित शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणा, पीकविमा, नैसर्गिक आपत्ती, नुकसानभरपाई, सिंचन, वीजपुरवठा, वाढता उत्पादन खर्च, शेतमालाचे बाजारभाव, कृषी निविष्ठा आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणींचा सामना करावा लागतो. या समस्यांचे स्वरूप परस्परांशी जोडलेले असल्याने त्यावर विभागवार तोडगा काढण्याऐवजी सर्वसमावेशक आणि

समन्वयात्मक यंत्रणा उभी करणे आवश्यक असल्याचे आ.मुनगंटीवार यांनी निवेदनात अधोरेखित केले आहे.

शेतकरी हा कोणत्याही एका जातीचा, धर्माचा किंवा पंथाचा नसतो. तो एक स्वतंत्र सामाजिक आणि आर्थिक घटक आहे. विविध समाजघटकांतील नागरिक शेती व्यवसायाशी जोडलेले असून त्यांच्या सामाजिक ओळखी वेगवेगळ्या असल्या तरी शेती करताना भेडसावणारे प्रश्न बहुतांश वेळा समान असतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे जात, धर्म आणि राजकीय विचारसरणीच्या पलीकडे जाऊन पाहण्याची आवश्यकता असल्याचे आ.मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले आहे. राज्यातील विविध सामाजिक घटकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या विकासासाठी स्वतंत्र आयोग कार्यरत असताना, कृषी क्षेत्राचा कणा असलेल्या शेतकऱ्यांसाठीही स्वतंत्र आयोग असणे आवश्यक असल्याची भूमिका आ.मुनगंटीवार यांनी मांडली आहे.

शेतकरी प्रश्नांचा वेध; आयोगाची व्यापक कार्यकक्षा

प्रस्तावित आयोगाने शेतकऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक व कृषिविषयक समस्यांचा अभ्यास करून शासनाला उपाययोजना सुचवाव्यात. कर्जमाफी, पीककर्ज, पीकविमा, नुकसानभरपाई, नैसर्गिक आपत्तीतील मदत, शेतमालाचे बाजारभाव आणि उत्पादन खर्च यांसारख्या महत्त्वपूर्ण प्रश्नांची दखल आयोगाने घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच विविध शासकीय विभागांमध्ये समन्वय साधून शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करणे, सिंचन, वीजपुरवठा, आधुनिक तंत्रज्ञान व कृषी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देणे, तसेच शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना सुचविणे या जबाबदाऱ्यांचा समावेश असावा. महिला, अल्पभूधारक व आदिवासी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देतानाच शेतकरी संघटना आणि प्रत्यक्ष शेतकऱ्यांना आपल्या समस्या थेट मांडण्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे, अशी अपेक्षा आ.मुनगंटीवार यांनी व्यक्त केली आहे.

उत्तरदायी आणि अधिकारसंपन्न आयोगाची मागणी

प्रस्तावित आयोग केवळ शिफारशी करणारा न राहता शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल घेऊन संबंधित विभागांकडून माहिती मागविणे व प्रश्नांच्या निराकरणासाठी प्रभावी पाठपुरावा

करणारा असावा, असा आ. मुनगंटीवार यांचा आग्रह आहे. आयोगाच्या शिफारशींवर ९० दिवसांत निर्णय घेणे, त्या अमान्य केल्यास कारणे लेखी कळविणे आणि आयोगाचा वार्षिक अहवाल विधानमंडळासमोर सादर करणे बंधनकारक असावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.आयोगाला स्वतंत्र अध्यक्ष, सदस्य, अर्थसंकल्प, प्रशासकीय यंत्रणा आणि चौकशी व माहिती मागविण्याचे कायदेशीर अधिकार देण्यात यावेत. प्रत्येक विभागात तक्रार निवारण यंत्रणा उभारण्यासह आयोगात अनुभवी शेतकरी प्रतिनिधी, कृषी तज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, विद्यापीठांचे प्रतिनिधी, महिला शेतकरी आणि सहकार व पणन क्षेत्रातील जाणकारांचा समावेश असावा, असेही निवेदनात सुचविण्यात आले आहे.

आ.मुनगंटीवार यांचा विधानसभेत शेतकरी हिताचा सातत्यपूर्ण आग्रह

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेतही सातत्याने ठाम भूमिका मांडली आहे. कृषी समृद्धी योजनेसाठी दरवर्षी पाच हजार कोटींची तरतूद, पीकविमा योजनेतील त्रुटी दूर करणे, खत-बियाण्यांमधील फसवणूक रोखण्यासाठी स्वतंत्र 'ॲग्रीकल्चर ऑफेन्स विंग' स्थापन करणे आणि कृषी योजनांच्या निधीबाबत श्वेतपत्रिका प्रसिद्ध करणे, अशा मागण्या त्यांनी यापूर्वी केल्या आहेत.यासोबतच धान उत्पादकांना प्रतिहेक्टरी २० हजार रुपये बोनस, अनुदानाचे वेळेत वितरण आणि शेतकऱ्यांच्या प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी स्वतंत्र विशेष न्यायालयांची स्थापना करण्याची मागणीही त्यांनी मांडली आहे. शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी पुरेसा निधी, सक्षम प्रशासकीय यंत्रणा आणि शेतकऱ्यांना वेळेत न्याय देणारी व्यवस्था आवश्यक असल्याची आ.मुनगंटीवार यांची भूमिका राहिली आहे.

स्वतंत्र कायद्याद्वारे आयोगाच्या स्थापनेची मागणी

महाराष्ट्रातील १ कोटी ७१ लाखांहून अधिक कृषी धारणांशी संबंधित शेतकरी कुटुंबांच्या प्रश्नांसाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधणारी आणि शेतकऱ्यांना थेट शासनापर्यंत आपले म्हणणे मांडता येईल, अशी स्वतंत्र यंत्रणा आवश्यक असल्याचे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी नमूद केले आहे.त्यामुळे स्वतंत्र, स्वायत्त व सक्षम ‘महाराष्ट्र राज्य शेतकरी आयोग’ स्थापन करून त्याला कायदेशीर अधिष्ठान देण्यासाठी स्वतंत्र कायदा करावा, तसेच आयोगाच्या स्थापनेसाठी आवश्यक प्रशासकीय व आर्थिक तरतुदी करण्याचे निर्देश द्यावेत, अशी विनंती आ.मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली आहे.

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 9969 / नोव्हेंबर / 2026 दिनांक : 14.11.2026

प्रति,

मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

वंदेमातरम्...!!

विषय: शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र **'महाराष्ट्र राज्य शेतकरी आयोग'** स्थापन करण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र हे कृषिप्रधान राज्य असून शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामीण व्यवस्थेचा प्रमुख आधारस्तंभ आहे. राज्याच्या विकासामध्ये शेतकऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५ नुसार, कृषी गणना २०२१-२२ च्या तात्पुरत्या आकडेवारीप्रमाणे राज्यात एकूण १ कोटी ७१ लाख ११ हजार कार्यरत कृषी धारणांची नोंद असून त्यांचे एकूण क्षेत्र सुमारे २१०.७९ लाख हेक्टर आहे. ही आकडेवारी राज्यातील कृषी क्षेत्राची व्यापकता अधोरेखित करते.

मात्र, एवढ्या मोठ्या कृषी क्षेत्राशी संबंधित शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आजही स्वतंत्र आणि सक्षम व्यासपीठ उपलब्ध नाही. शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणा, पीकविमा, नैसर्गिक आपत्ती, नुकसानभरपाई, सिंचन, वीजपुरवठा, शेतीचा वाढता उत्पादन खर्च, शेतमालाचे बाजारभाव, कृषी निविष्ठा आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी अशा अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे.

राज्यात विविध सामाजिक घटकांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचविणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र आयोग स्थापन करण्यात आलेले आहेत. त्याच धर्तीवर शेतकऱ्यांसाठीही स्वतंत्र आयोग स्थापन होणे अत्यंत आवश्यक आहे.

कारण शेतकरी हा कोणत्याही एका जातीचा, धर्माचा किंवा पंथाचा नसतो. शेतकरी ही एक स्वतंत्र सामाजिक व आर्थिक ओळख आहे. राज्यातील सर्व समाजघटकांतील नागरिक शेती व्यवसायाशी जोडलेले आहेत. त्यांच्या जाती-धर्म वेगवेगळ्या असल्या तरी शेती करताना त्यांना भेडसावणारे प्रश्न बहुतांश वेळा समान असतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे जात, धर्म आणि राजकीय विचारसरणीच्या पलीकडे जाऊन पाहण्याची गरज आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र, **'महाराष्ट्र राज्य शेतकरी आयोग'** (Maharashtra State Farmers Commission) स्थापन करण्यात यावा, अशी माझी आग्रही मागणी आहे.

पत्ता : 'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र. 07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक :

दिनांक :

प्रस्तावित शेतकरी आयोगाची प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे असावीत :

१. राज्यातील शेतकऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक व कृषीविषयक समस्यांचा सर्वंकष अभ्यास करून शासनाला उपाययोजना सुचविणे.
२. शेतकरी कर्जमाफी, कर्ज पुनर्गठन आणि पीककर्ज उपलब्धतेतील अडचणींचे निराकरण करण्यासाठी पाठपुरावा करणे.
३. पीकविमा योजनेतील त्रुटी, विमा कंपन्यांकडून होणारा विलंब आणि नुकसानभरपाईसंदर्भातील तक्रारींची दखल घेणे.
४. दुष्काळ, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, गारपीट व इतर नैसर्गिक आपत्तींच्या काळात शेतकऱ्यांना योग्य मदत मिळण्याराठी शासनाकडे शिफारशी करणे.
५. शेतमालाला योग्य बाजारभाव मिळणे, उत्पादन खर्च, कृषी निविष्ठांचे दर आणि बाजारपेठेतील अडचणींचा अभ्यास करणे.
६. कृषी, महसूल, सहकार, पणन आणि इतर शासकीय विभागांमध्ये शेतकऱ्यांची प्रलंबित कामे व तक्रारी सोडविण्यासाठी समन्वय साधणे.
७. सिंचन, वीजपुरवठा, कृषी पायाभूत सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान आणि कृषी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देणे.
८. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी आर्थिक, सामाजिक व कुटुंबाच्या सुरक्षिततेसंदर्भात प्रभावी उपाययोजना सुचविणे.
९. महिला शेतकरी, अल्पभूधारक, आदिवासी शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांना प्राधान्य देणे.
१०. शेतकरी संघटना, शेतकरी प्रतिनिधी आणि प्रत्यक्ष शेतकऱ्यांना आपल्या समस्या आयोगासमोर मांडण्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून देणे.
११. शासनाच्या विविध कृषी योजनांची अंमलबजावणी आणि शेतकऱ्यांना मिळणारा प्रत्यक्ष लाभ यावर नियमित देखरेख ठेवणे.

आयोगाला स्वतंत्र अधिकार व प्रशासकीय स्वायत्तता देण्याबाबत :

प्रस्तावित आयोग केवळ शिफारशी करणारी संस्था न राहता शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल घेणारी, संबंधित विभागांकडून माहिती व अहवाल मागविणारी आणि प्रश्नांच्या निराकरणासाठी शासनाकडे प्रभावी पाठपुरावा करणारी सक्षम यंत्रणा असावी.

१. आयोगाने शासनाकडे सादर केलेल्या शिफारशींवर ९० दिवसांच्या आत निर्णय घेणे बंधनकारक करण्यात यावे.
२. आयोगाच्या शिफारशी मान्य न केल्यास त्याबाबतची कारणे लेखी स्वरूपात आयोगाला कळविण्यात यावीत.

पत्ता : 'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र. 07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक :

दिनांक :

३. आयोगाचा वार्षिक अहवाल आणि शासनाने घेतलेल्या निर्णयांचा अहवाल विधानमंडळासमोर सादर करण्यात यावा.
४. शेतकऱ्यांच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी आणि संबंधित शासकीय विभागांकडून माहिती मागविण्यासाठी आयोगाला आवश्यक कायदेशीर अधिकार देण्यात यावेत.
५. आयोगासाठी स्वतंत्र अध्यक्ष, सदस्य, कार्यालय, अर्थसंकल्पीय तरतूद, प्रशासकीय यंत्रणा व आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात यावे.
६. राज्यातील प्रत्येक विभागात शेतकऱ्यांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी व त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात यावी.

आयोगामध्ये अनुभवी शेतकरी प्रतिनिधी, कृषी तज्ज्ञ, कृषी अर्थतज्ज्ञ, कृषी विद्यापीठांचे प्रतिनिधी, सहकार व पणन क्षेत्रातील अभ्यासक, महिला शेतकरी प्रतिनिधी तसेच विविध कृषी क्षेत्रांतील जाणकारांचा समावेश करण्यात यावा.

महाराष्ट्रातील १ कोटी ७१ लाखांहून अधिक कृषी धारणांशी संबंधित शेतकरी कुटुंबांचे प्रश्न केवळ एका विभागाच्या माध्यमातून सोडविणे शक्य नाही. त्यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधणारी आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारी स्वतंत्र यंत्रणा निर्माण होणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांना आपल्या अडचणींसाठी वेगवेगळ्या शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, तर त्यांच्या समस्या ऐकून घेणारी, शासनापर्यंत पोहोचविणारी आणि त्यांच्या निराकरणासाठी सातत्याने पाठपुरावा करणारी सक्षम यंत्रणा असावी.

शेतकरी हा केवळ शासनाच्या योजनांचा लाभार्थी नसून राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आणि समाजव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण घटक आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना जात, धर्म किंवा पंथाचे बंधन नसते. त्यामुळे त्यांच्या सर्वांगीण हितासाठी स्वतंत्र आयोगाची स्थापना करणे ही काळाची नितांत गरज आहे.

तरी आपण या महत्त्वपूर्ण मागणीचा सकारात्मक विचार करून महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र, स्वायत्त व सक्षम **'महाराष्ट्र राज्य शेतकरी आयोग'** स्थापन करण्यास मान्यता द्यावी. या आयोगाला स्वतंत्र कायदेशीर अधिष्ठान व आवश्यक अधिकार देण्यासाठी स्वतंत्र कायदा तयार करण्याची प्रक्रिया सुरू करावी. तसेच आयोगाच्या स्थापनेसाठी आणि कार्यान्वयनासाठी आवश्यक प्रशासकीय व आर्थिक तरतुदी करण्याचे निर्देश संबंधित विभागांना द्यावेत, ही नम्र विनंती.

कार्यवाहीची रूपरेषा मला कळवल्यास मी आपला आभारी राहीन.

योग्य सहकार्याची अपेक्षा

सविनय धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत-
श्री. बंडू गौरकार, सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषी मुल्य आयोग, मुंबई

पत्ता :'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र. 07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)